चतुर्थश्रेणीतील सफाई कामगार, स्वच्छक इत्यादी
तत्सम पदांवरील सेवा भरतीच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- आरटीआर- १०८३-१२,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक :- २३ मार्च १९८३.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- आरटीआर- १०६५ड, दिनांक २५-८-१९६५

## शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- आरटीआर- १०६५-ड, दिनांक २५-८-१९६५ नुसार चतुर्थश्रेणीतील पदांसाठी सेवा प्रवेश नियम विहीत केले आहेत. त्या नियमानुसार चतुर्थश्रेणीतील पदावर नेमणूक होण्यासाठी किमान ४ थी इयत्ता उत्तीर्ण असणे अशी शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे. चतुर्थश्रेणीतील सफाई कामगार, स्वच्छक आदी तत्सम पदांवरील लोकांना कामाच्या दृष्टीने त्यांनी धारण केलेल्या पदांकरिता लिहिण्या वाचण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आदेश दिले आहेत की, चतुर्थश्रेणीतील सफाई कामगार, स्वच्छक आदी तत्सम पदांवरील कर्मचाऱ्यांना कराव्या लागणाऱ्या कामाच्या स्वरुपावरुन त्यांना लिहिता वाचता येणे या अटीची आवश्यकता आहेच असे नाही. म्हणून त्या पदांवर उमेदवारांची नियुक्ती करतांना किमान ४ थी इयत्ता उत्तीर्ण असणे या शैक्षणिक अर्हतेच्या पूर्ततेचा काटेकोरपणे अवलंब करण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

व. ज. खानविलकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
23 JUN 1983
शाखा--

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

(कृ. मा. प.)